मुंबई पोलीस आयुक्तांची पोलिसांना अनोखी दिवाळीभेट

३९ पोलीस अधिकारी व कर्मचारी निलंबनाच्या कारवाईतून मुक्त

प्रतिनिधी/मुंबई

मुंबईचे पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलीसदलातील काही पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अनोखी भेट दिली आहे. गेल्या दोन वर्षांपासून निलंबित असलेल्या ३९ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची आता निलंबनाच्या कारवाईतून सुटका करण्यात आली असून या सर्वांना नायगाव येथील सशस्त्र विभागात रुजू होण्याचे आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक १८ जानेवारी २०१९ रोजी मेघवाडी पोलीस ठाण्याच्या एका पोलीस शिपायाला पोलीस सेवेतून निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर २९ एप्रिल २०२० पर्यंत आतापर्यंत ३८ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विविध कारणांवरुन सेवेतून निलंबित करण्यात आले होते. त्यात दोन सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, सात पोलीस हवालदार, २३ पोलीस शिपाई आणि पाच पोलीस नाईक आदी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या सर्वांवर गेल्या काही महिन्यांपासून निलंबनाची कारवाई सुरू होती. त्यांना आठवड्यातून एकदा पोलीस ठाण्यात हजेरी लावण्याचे आदेश देण्यात आले होते. तसेच निलंबनकाळात त्यांच्या वेतनात कपात करण्यात आली होती.

दरम्यान, कामात कसुरी केल्याबाबत त्यांच्यावर ही निलंबनाची कारवाई झाली होती. अलीकडेच पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या निलंबनाच्या कारवाईबाबत एक आढावा घेतला होता. त्यात निलंबित असलेल्या ३९ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेनंतर त्यांचे निलंबन काढून त्यांना पुन्हा सेवेत रुजू करण्याचा निर्णय झाला होता. अंतिम तसेच विभागीय चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांची निलंबनातून सुटका करण्यावर सर्वांचे एकमत झाले होते. यावेळी त्यांना तातडीने नायगाव येथील सशस्त्र विभागात रुजू होण्याचे आदेश जारी करण्यात आले आहे. दिवाळीत एकाच वेळेस ३९ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे निलंबन रद्द करून त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्यात आल्याने पोलीसदलात प्रचंड आनंदाचे वातावरण आहे.

कडधान्य पिकांची खरेदीही भात खरेदीकेंद्राकडून व्हावी

प्रतिनिधी/वाडा

भात पिकाला राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत भात खरेदी केंद्राकडून आधारभूत किंमत मिळते तर इतर वाल, तूर, हरभरा यांसारख्या रब्बी हंगामात होत असलेल्या कडधान्य पिकांची खरेदीही भात खरेदी केंद्राकडून व्हावी, तसेच भाडे तत्वावर घेतलेल्या जागेतील भातखरेदी केंद्रांची थकलेली भाडी त्वरित द्यावीत, अशा मागण्या शेतकऱ्यांनी केल्या आहेत. पालघर जिल्ह्यातील परळी येथे आधारभूत खरेदी योजनेच्या भात खरेदीकेंद्राचे उद्घाटन अनुसूचित जमाती कल्याण समितीचे प्रमुख तथा आमदार दौलत दरोडा आणि विक्रमगड विधानसभा मतदार संघाचे आमदार सुनील भुसारा यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ही समस्या शेतकरीवर्गाकडून मांडण्यात आली. दरम्यान, हे प्रश्न सोडवू, असे आश्वासन आमदारांकडून देण्यात आले.

शेतकरीवर्गाची मागणी

व्यापारीवर्गाकडून कडधान्यातही शेतकऱ्यांची होतेय फसवणूक

भात उत्पादक शेतकरीवर्गाची भात पिकाची खरेदी होत असताना जशी अडते आणि दलालामार्फत कमी भाव देऊन फसवणूक केली जाते त्याचप्रमाणे कडधान्यपिकाला आधारभूत किंमत मिळत नसल्याने बाजारात किंवा व्यापारी लोकांकडून फसवणूक केली जाते. बाजारभावापेक्षा कमी भावात या कडधान्य पिकाची खरेदी होत असल्याची खंत शेतकरीवर्ग करत असतो. यासाठी भात पिक उत्पादित शेतकऱ्यांच्या भाताबरोबर मुग, वाल, हरभरा, तुर, उडीद या कडधान्यांची खरेदी करण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी यावेळी केली.

यंदाच्या मोसमातील पहिली बर्फवृष्टी काश्मीरमध्ये झाल्यावर 'पृथ्वीवरचा स्वर्ग' असा विलोभनीय दिसू लागला. (छाया – सज्जाद हमीद, काश्मीर)

साईमंदिरात पारंपरीक पध्दतीने लक्ष्मीपूजन संपन्न

प्रतिनिधी/शिर्डी

साईबाबा संस्थानच्या वतीने मंदिरात पारंपारीक पध्दतीने लक्ष्मीपूजन विधीवत संपन्न झाले. दिपावली निमित्त साईमंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई, मंदिर व परिसरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. यावर्षी कोरोनाच्या पार्श्वभुमिवर प्रथमच भक्तविना लक्ष्मीपुजन झाले. संस्थानच्या वतीने मंदिर परिसरात तर चार नंबर गेटवर शिर्डी ग्रामस्थांच्या वतीने पणत्या प्रज्वलीत करण्यात आल्या होत्या. लेंडीबागेत भाविकांच्या उपस्थित होणारा दीपोत्सव मात्र यंदा झाला नाही.

दीपावलीच्या चारही दिवशी साईबाबांना उटणे लावून मंगल स्नान घालण्यात आले होते. साईंना देण्यात आलेल्या नैवेद्यात लाडू, चकली, चिवडा, करंजी असे फराळ होते. नवीन वस्त्र साईबाबांना परिधान करण्यात आले होते. दीपावलीनिमित्त साईबाबांना साडेतीन कोटींची आभुषणे चढवण्यात आली होती. साईमंदीर व मंदीर परिसरात फुलांची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली.

विविध रंगी फुलांच्या सजावटीमुळे समाधी मंदीर फुलून गेले होते. साईबाबा संस्थानचे कार्यकारी अधिकारी कान्हुराज बगाटे व त्यांची पत्नी संगिता बगाटे यांच्या हस्ते श्रीसाईबाबा समाधी मंदिरात लक्ष्मीपूजन करण्यात आले. सायंकाळी साडेचार वाजता समाधी चौथऱ्यावर चौरंग ठेवून त्यावर वस्त्र मांडण्यात आला. त्यात चांदीची नाणी ठेवण्यात आली. लक्ष्मीजी व साईंची मुर्ती ठेवून पूजा करण्यात आली.

दरवर्षी लक्ष्मीपूजन निमित्त साईदरबारी भाविकांची मोठी गर्दी होत असते. दीपोत्सव साजरा करत भाविक दिवाळी साईनगरीत साजरी करतात मा[illegible] यावर्षी भाविकांना येता न आल्याने हिरमोड झाला. दरम्यान, आता मंदिर उघणार असल्याने भाविकामध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

सफाई कर्मचाऱ्यांना मिठाईचे वाटप

वार्ताहर/मुरुड जंजिरा

मुरुड शहरातील सुमारे ४६ सफाई कर्मचारी मुरुड शहराची रोज सफाई करत असतात. अत्यंत अल्प मजुरीवर ते मुरुड शहराची सफाई करून आपले कर्तव्य बजावत असतात. अशा प्रामाणिक कर्तव्य बजावणाऱ्या सफाई कर्मचारीवृंदांनीसुद्धा दिवाळी साजरी करावी, या हेतूने स्टार फाऊंडेशनकडून या सर्व सफाई कर्मचाऱ्यांना स्टीलचे प्रत्येकी एक ताट व मिठाईचे बॉक्स वाटप करण्यात आले. यावेळी फाऊंडेशनचे प्रदेश अध्यक्ष जाहिद फकजी म्हणाले की, मुरुड शहराची स्वच्छता अबाधित राखण्याचे मौल्यवान काम सफाई कर्मचारी करीत असतात. तुटपुंज्या पगारात शहराची स्वच्छता राखण्याचे मौल्यवान काम करत असल्याने स्टार फाऊंडेशनतर्फे दिवाळीनिमित्त मिठाई व स्टिलच्या ताटाचे वाटप केल्याचे त्यांनी सांगितले.

'सुपर स्प्रेडर'मुळे कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची शक्यता अधिक

आरोग्य विभागाने व्यक्त केली भीती

वृत्तसंस्था/पुणे

राज्यात सर्वत्र हळूहळू नियंत्रणात आलेला कोरोनचा प्रादुर्भाव 'सुपर स्प्रेडर'मुळे पुन्हा वाढण्याची शक्यता असून याच 'सुपर स्प्रेडर'मुळे कोरोनाच्या अधिक तीव्र कोरोनाच्या लाटेची शक्यता असल्याची चिंता आरोग्यविभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे 'सुपर स्प्रेडर' व्यक्तींचे सर्वेक्षण आणि प्रयोगशाळा तपासणी प्राधान्याने करावी, अशा सूचना आरोग्य विभागाने यंत्रणांना दिल्या आहेत. तसेच दुसऱ्या लाटेची शक्यता गृहित धरून विविध उपाययोजनांवर लक्ष केंद्रीत करण्यास सांगण्यात आले आहे.

जनसंपर्क अधिक असलेले विविध व्यावसायिक, घरगुती सेवा पुरवणारे कामगार, मजूर, सुरक्षारक्षक, अत्यावश्यक सेवा पुरवणारे शासकीय कर्मचारी हे कोरोनाच्या अनुषंगाने 'सुपर स्प्रेडर' आहेत. कोरोनाची दुसरी लाट येण्यामध्ये त्यांची भुमिका महत्त्वाची असेल. राज्यात जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात कोरोनाची दुसरी लाट येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याअनुषंगाने राज्याच्या आरोग्य संचालक डॉ. अर्चना पाटील यांनी परिपत्रक काढून जिल्हा परिषद, महापालिका व आरोग्य यंत्रणेला सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. लोकांशी सतत संपर्क येणाऱ्या व्यक्तींमुळे कोरोनाचा प्रसार अधिक वेगाने होतो, हे अनेक अभ्यासातून पुढे आले आहे. दुसरी लाट येण्यामध्येही अशा सुपर स्प्रेडर व्यक्ती महत्त्वाची भुमिका बजावू शकतात, असे परिपत्रकात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. या व्यक्तींचे समूह स्वरूपात सर्वेक्षण तसेच प्रयोगशाळा तपासणी करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे कोरोना प्रसाराचा वेग रोखला जाऊ शकतो. त्यासाठी दैनंदिन प्रयोगशाळा तपासणीमध्ये किमान ५० टक्के नमुने हे या गटातील व्यक्तींचे असावे, असे डॉ. पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

MINI DIAMONDS (INDIA) LIMITED

07-A, Floor-0, Nusser House, Mama Prasad Marg, Opera House, Girgaon, Mumbai- 400 004.
Tel.: (91-22) 23671222, Email-accounts@minidiamonds.net, www.minidiamonds.net
CIN - L36912MH1987PLC042515

(₹ in Lakhs, except EPS)

UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED 30TH SEPTEMBER 2020

Sr. No.	Particulars	Quarter ended			Half year ended		Year ended
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]

(₹ in Lakhs)

UNAUDITED STATEMENT OF ASSETS & LIABILITIES

Particulars	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]

NOTES :

1 The company's main business segment is manufacturing of Gems & Jewellery, Hence, there are no separate reportable segments as per Ind AS 108 "Operating Segment".

2 The above results were reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Company at their meeting held on 12th November, 2020 and the same was subjected to "Limited Review" by the Statutory Auditors of the Company.

3 Figures for the previous period are regrouped/reclassified wherever necessary, to make them comparable.

For and on behalf of the Board
Mr. Upendra Shah
DIN 00748451
Chairman & Managing Director

Place: Mumbai
Date : 12th November, 2020

THACKER AND CO. LTD.

ठाकेर अॅण्ड कंपनी लिमिटेड

Fujisan

सीआयएन : एल२१०९८एमएच१८७८पीएलसी०००३३.
नोंदणी. कार्यालय : भोगिलाल हरगोविंददास बिल्डिंग, मेझानिन मजला, १८/२०, के. दुभाष मार्ग, मुंबई-४०० ००१.
दू. क्र.: ९१-२२-३०२१३३३३; ई-मेल : thacker@thacker.co.in; वेबसाईट : www.thacker.co.in

३० सप्टेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध वर्षासाठी एकत्रित अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचे विवरण

(अन्य प्रकारे नमूद केल्या खेरीज रु. लाखात)

अनु. क्र.	तपशील	संपलेली तिमाही			संपलेले अर्धवर्ष		संपलेले वर्ष
		३०.०९.२०२०	३०.०६.२०२०	३०.०९.२०१९	३०.०९.२०२०	३०.०९.२०१९	३१.०३.२०२०
		(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(लेखापरिक्षित)
१	प्रवर्तनातून एकूण उत्पन्न	१७२.९७	१४०.३३	३९९.९६	३०३.३०	३७६.९८	७७९.३१
२	कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	१४.१०	४०.३९	६७.०९	७४.४९	८४.९७	३९९.३७
३	कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	१४.१०	४०.३९	६७.०९	७४.४९	८४.९७	३९९.३७
४	कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	३३.३८	३१.३५	६६.०९	५६.६३	७९.३३	१८९.१२
५	सहयोगींच्या नफा/(तोटा) चा हिस्सा	१९४.३०	(७.९८)	१३३.३०	१८६.३९	३९४.३७	५४८.३४
६	कालावधीसाठी इतर सर्व समावेशक उत्पन्न	७९.५७	७९.३३	(८६.९५)	१५८.८०	(१७७.९०)	(३३४.९८)
७	कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा (करोत्तर), सहयोगींच्या नफा/(तोटा) चा हिस्सा आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	३५७.०५	१०४.७९	१९३.७९	४०१.६४	१८६.७०	४१९.८९
८	समभाग भांडवल	१०.८८	१०.८८	१०.८८	१०.८८	१०.८८	१०.८८
९	राखीव (मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दाखवलेल्या पुनर्मुल्यांकित राखीव वगळून)	-	-	-	-	-	६,७७०.३३
१०	प्रति समभाग प्राप्ती : मूलभूत आणि सौम्यिकृत (रु.)	१९.९९	३.३३	१८.३३	३३.३३	२६.९९	५७.५२

टिपा :

१. वरील वित्तीय निष्कर्ष लेखापरिक्षण समितीने पुनर्विलोकीत करुन त्यांची शिफारस केली आणि संचालक मंडळाने ते अभिलिखित केले.

२. वैधानिक लेखापरिक्षकांकडून सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत मर्यादित पुनर्विलोकन करण्यात आले आहे.

३. कंपनीने तिचे नॉन-बँकिंग फायनान्स इन्स्टिट्यूशन ('एनबीएफआय') लायसन्स स्वेच्छेने स्वाधीन करण्याकरिता रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ('आरबीआय') कडे केलेल्या एका अर्जानुसार, आरबीआयने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ च्या आदेशाने ('आदेश'), आदेशाच्या तारखेपासून एक एनबीएफआय म्हणून तिचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द केले.

४. वरीलप्रमाणे एनबीएफसी लायसन्स स्वाधीन केल्याच्या परिणामी, हा निष्कर्षांना कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत विहित कंपनीज (इंडियन अकाऊंटींग स्टँडर्डस्) रुल्स, २०१५ (इंड एएस) आणि प्रयोज्य असलेल्या त्या प्रमाणांत अन्य मान्यताप्राप्त लेखा पद्धती आणि धोरणे लागुसार बनवले आहे.

५. कोविड-१९ साथीच्या उद्रेकाचा प्रसार भारत आणि जगभरात जोराने झाला. सरकारने प्रसार रोखण्यासाठी अवलंबिलेल्या लॉकडाऊन व अन्य उपायांचा आर्थिक घडामोडींवर परिणाम झाला. व नियमित व्यवहारात अडथळे आले. येणी, कर्जे, गुंतवणूक आणि वस्तुसूची सह सर्व मत्ता आणि दायित्वांच्या धारण रकमांवर कोविड-१९ शी संबंधित साथरोगापासून उद्भवणाऱ्या परिणामांना कंपनीने विचारांत घेतले आहे. जेव्हा व्यवस्थापनाने कोविड-१९ साथरोगाच्या वित्तीय विवरणांवरील शक्य असलेल्या परिणामांचा आढावा घेतला आहे. भविष्यातील आर्थिक घडामोडींवर त्याच्या परिणामांबाबत अनिश्चिती असल्याने, ते त्या त्या वेळच्या परिस्थितीवर अवलंबून असेल.

६. एकत्रित वित्तीय विवरणांमध्ये खालील निष्कर्ष समाविष्ट आहेत :-

नाव	संबंध
फुजिसान टेक्नॉलॉजीज लिमिटेड	उपकंपनी
एएमजे लँड होल्डिंग्ज लिमिटेड	सहयोगी कंपनी
पुदुमजी पेपर प्रॉडक्टस लिमिटेड	सहयोगी कंपनी

७. चालू कालावधीच्या सादरीकरणाशी सुसंगत होण्याकरिता आवश्यकतेप्रमाणे मागील कालावधीसाठीची आकडेवारी पुनर्वित/पुनर्मांडीत केली आहे.

८. वरील माहिती म्हणजे सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसकडे सादर केलेल्या ३० सप्टेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही अर्धवर्षासाठी वित्तीय निष्कर्षांच्या तपशिलवार विवरणाचा एक उतारा आहे. ह्या वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजची वेबसाईट (www.bseindia.com) व कंपनीची वेबसाईट (www.thacker.co.in) वर उपलब्ध आहे.

९. महत्त्वाची अलिप्त वित्तीय माहिती खालीलप्रमाणे :-

(अन्य प्रकारे नमूद केल्या खेरीज रु. लाखात)

अनु. क्र.	तपशील	संपलेली तिमाही			संपलेले अर्ध वर्ष		संपलेले वर्ष
		३०.०९.२०२०	३०.०६.२०२०	३०.०९.२०१९	३०.०९.२०२०	३०.०९.२०१९	३१.०३.२०२०
		(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(लेखापरिक्षित)
१	प्रवर्तनातून एकूण उत्पन्न	१११.०२	९४.३०	१४१.७७	२०५.३१	२१०.३३	४३०.८७
२	कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा)	३३.८९	३६.०५	५७.९२	६९.९३	५५.९९	१५३.९९
३	कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	१५.७७	३०.९८	५७.९८	४६.७४	५५.८२	१३७.९३
४	इतर सर्वसमावेशक उत्पन्न	७९.०७	२१.४८	(५७.३९)	१००.५५	(१०.७३)	(१८९.९६)
५	एकूण इतर सर्वसमावेशक उत्पन्न (इतर सर्वसमावेशक उत्पन्न आणि करोत्तर निव्वळ नफा धरून)	८९.९८	५२.९६	०.४८	१४६.३०	(३४.९१)	(४४.८३)

ठाकेर अॅण्ड कंपनी लिमिटेडसाठी
अरुणकुमार महावीरप्रसाद बाजोरिया
(संचालक)

ठिकाण : मुंबई
दिनांक : १२.११.२०२०